॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१७ ( ) क्यूएसद्वारा भारतातील सर्वोत्तम ७५ विद्यापीठांच्या जाहीर झालेल्या यादीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने ५६ वे स्थान प्राप्त केले आहे. या यादीत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यापीठात हे विद्यापीठ तिसऱ्या स्थानावर आहे.

क्वाक्क्वारेली सायमंड्स (क्यूएस) ही शिक्षण क्षेत्रात काम करणारी असून ब्रिटीश कंपनी असून या कंपनीकडून भारतात गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देणाऱ्या सार्वजनिक, खाजगी विद्यापीठांचे रँकिंग करण्यात आले आहे. या रँकिंगच्या मूल्यांकनासाठी संशोधन, अध्ययन, रोजगार क्षमता, ऑनलाईन/दुरस्थ शिक्षण, सामाजिक दायित्व, नाविन्यपूर्ण कल्पना, सर्वसमावेशकता असे काही निकष निश्चित करण्यात आले होते. देशातील सर्वोत्तम ७५ विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने ५६ वे स्थान प्राप्त केले आहे. विद्यापीठातील पीएच.डी प्राप्त शिक्षकांसाठी ७७.३ गुण, अध्यापकांच्या एकूण शोधनिबंधासाठी ७३.१ आणि प्रत्येक शोधनिबंधाच्या उद्धरण (सायटेशन) साठी ७६.९ गुण प्राप्त झाले आहेत. या आधारे विद्यापीठाने हे स्थान पटकावले आहे. या यादीत पारंपारिक शिक्षण देणाऱ्या महाराष्ट्रातील चार अकृषि विद्यापीठांचा समावेश असून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ तिसऱ्या स्थानावर आहे.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने गेल्या दोन वर्षात नेत्रदीपक कामगिरी केली असून नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यापीठात राबविले जात आहेत. विद्यापीठात विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संशोधनासाठी देखील सातत्याने भर दिला जात असून पायाभूत सुविधा पुरविण्यावर कुलगुरुंचा भर आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या विद्यापीठाचा विद्यार्थी मागे राहता कामा नये यासाठी कुलगुरुंच्या नेतृत्वाखाली सर्व अधिकार मंडळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी कार्यरत आहेत. विद्यापीठाने देश पातळीवर स्थान प्राप्त केल्यामुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संचालक, विद्यार्थी विकास आणि संचालक राष्ट्रीय सेवा योजना या पदासाठी संलग्नित महाविद्यालयातील इच्छुक असलेल्या अध्यापकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम २३ (क) नुसार संचालक, विद्यार्थी विकास आणि कलम २३ (ख) नुसार संचालक, राष्ट्रीय सेवायोजना ही पदे भरली जाणार आहेत. या पदासाठी अध्यापनाचा दहा वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. संचालक, विद्यार्थी विकाससाठी अभ्यासेत्तर व विस्तार कृती क्षेत्रात समाधानकारक कामगिरी आवश्यक असून रासेयोसाठी कार्यक्रम अधिकारी म्हणून तीन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. वयाची अट ५० वर्षापेक्षा कमी असावी. कुलगुरुंकडून नामनिर्देशन केले जाते. तीन वर्ष या पदाचा कालावधी असून इच्छुक उमेदवारांनी १६ नोव्हेंबर पर्यंत प्रशासन विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे अर्ज सादर करावे असे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले आहे.

..२..

**बातमी क्र.३**

जळगाव. दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो (महिला) आणि टेबल टेनिस (महिला) स्पर्धेचे भाग्यचक्र (लॉटस्) आज दि.१७ ऑक्टोबर रोजी काढण्यात आले.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

१३ ते १६ नोव्हेंबर दरम्यान पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो (महिला) आणि १९ ते २२ नोव्हेंबर दरम्यान टेबल टेनिस (महिला) स्पर्धांचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यामधील ७३ विद्यापीठांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेचे लॉटस् बुधवारी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, सहायक क्रीडा संचालक आर.ए.पाटील, प्रा.एम.वाय.चव्हाण, डॉ.आय.जी.धामणे, डॉ.भालचंद्र मोरे, प्रा.आर.आर.सोनवणे, प्रा.व्ही.व्ही.महाजन उपस्थित होते.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 17 ऑक्टोबर,2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत

(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी